(१)        अर्ज (उपदान) क्र. ७३/२०२४
निशाणी यु—६

**<u>उलटतपासणी विधिज्ञ श्री एस.एस. सासनकर, प्रतिवादींकरीता :—</u>**

२)        माझे मयत वडीलांची सेवा एकुण १७ वर्षे ०१ महिना ०२ दिवस एवढी झाालेली आहे. मला आता निशाणी क्र. यु—९ खाली दाखल केलेले रजेचा गोषवारा संदर्भातील कागदपत्रे दाखविण्यात आले. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, मयत भास्कर वाघ हे दि. ०१/०१/१९८७ ते ३१/१२/१९८७, १२७ दिवस, ०१/०१/१९८८ ते ३१/१२/१९८८, १२६ दिवस, ०१/०१/१९८९ ते ३१/१२/१९८९, ९५ दिवस, ०१/०१/१९९० ते ३१/१२/१९९०, १७३ दिवस, ०१/०१/१९९१ ते ३१/१२/१९९१, १९० दिवस, ०१/०१/१९९२ ते ३१/१२/१९९२, १३६ दिवस, ०१/०१/१९९३ ते ३१/१२/१९९३, १९९ दिवस, ०१/०१/१९९४ ते ०१/१२/१९९४, २४५ दिवस, ०१/०१/१९९५ ते ३१/१२/१९९५, १७९ दिवस, ०१/०१/१९९६ ते ०४/०५/१९९६, १०९ दिवस एवढे दिवस गैरहजेरी दाखविण्यात आलेली आहे.

३)        हे म्हणणे खरे नाही की, माझे मयत वडील उपरोक्त कालावधीमध्ये कर्तव्यावर हजर नव्हते. माझे वडील १९९६ मध्ये सेवानिवृत्त झाले आणि प्रस्तुतचे प्रकरण हे सन २०२४ मध्ये म्हणजेच जवळपास २८ वर्षाच्या विलंबाने दाखल करण्यात आले. मला विलंबाबाबत कोणतेही कारण सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचे वेतन ३८१९/— रु. एवढे होते या कथनाच्या अनुषंगाने अभिलेखावर मी कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. माहितीच्या अधिकारात मी प्रतिवादींकडे उपदान रक्कम देण्यात यावी म्हणुन अर्ज केला होता परंतु त्याची प्रत अभिलेखावर दाखल केली नाही. हे म्हणणे

खरे नाही की, मला देण्यात आलेली उपदान रक्कम योग्य असुन आता प्रतिवादी काहीही देणे लागत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्र खोटे असुन मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

स्वा/—

(शा. श. जहागिरदार)
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, बुलढाणा.

ठिकाण :— बुलढाणा.
दि. :— ०३/०७/२०२५